प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव
दिनांक :- 14/02/2018

प्रति,
मा.संपादक
. . . . . . . . . . .

विषय :- सावदा पोलीस स्टेशन भाग-5 गुरन.07/2018 भादवि.क.363

--==00==--

दिनांक :- 08/02/2018 रोजी दुपारी 02:00 ते 02:30 वाजेच्या दरम्यान सावदा पोलीस स्टेशन हद्दीतील 16 वर्षे वयाची अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने कसलेतरी आमीष दाखवुन पळवुन नेले बाबत मुलीचे पालाकांनी सावदा पोलीस स्टेशनला भाग-5 गुरन.07/2018 भादवि.क.363 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय कराळे, अपर पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह , अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत बच्छाव यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक श्री. सुनिल कुराडे व सपोनि श्री.राहुल वाघ यांना तात्काळ तपास पथक नेमुन तपास कामी सुचना व मार्गदर्शन केले होते.

पोलीस निरीक्षक स्थानिक श्री. सुनिल कुराडे व सपोनि श्री.राहुल वाघ यांनी PSI श्री.मनोज खडसे, पोहेकॉ.रविंद्र मोरे, विजय पाटील, पोना.सुरेश आढायगे, नरेंद्र वारुळे, दिनेश बडगुजर ,देवेंद्र पाटील, प्रशांत चिरमाडे अशांचे पथक तयार करुन मुंबई , ठाणे , मध्यप्रदेश राज्यात तपासकामी रवाना केले होते. सर्व ठिकाणावरुन माहिती संकलीत करुन सदरची अल्पवयीन मुलगी ही पालघर येथे असल्याची माहीती मिळाली असता तीस ताब्यात घेण्यात आलेले आहे.गुन्हयांचा पुढील तपास सपोनि श्री. राहुल वाघ करीत आहेत.

(सुनिल कुराडे)
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव